# स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत म.न.पा.केन्द्रीय कार्यालय परिसरात मा.महापौर व आयुक्त यांच्या उपस्थित स्वच्छता अभियान अधिकारी व कर्मचारी यांनी घेतला सहभाग



स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने सिव्हील लाईन स्थित मुख्यालयात आज दिनांक 01 ऑक्टोंबर, 2016 रोजी सकाळी 7 ते 9 वाजेदरम्यान मा.महापौर श्री.प्रवीण दटके, मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे यांनी स्वतः हातात झाडू घेवून श्रमदानास प्रारंभ केला व स्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

यावेळी मुख्यालय परिसरातील व मुख्य ईमारतीच्या वरच्या माळयावरील तुटलेले लाकडी व लोखंडी फर्निचर साहित्य, प्लास्टीक व उपयोगात नसलेले कुलर व उपयोगात नसलेल्या वस्तु व साहित्य हटविण्यात आले. व स्वच्छता अभियान मोठया प्रमाणात राबविण्यात आला. यावेळी निगम आयुक्त यांनी अपर आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे व सहा.आयुक्त श्री.प्रकाश वराडे यांना असे निर्देष दिलेत की, जे लाकडाचे फर्निचरची दुरूस्ती करून कार्यालयीन कामात उपयोग करता येईल त्यांची दुरूस्ती करा, बंद पडलेले कुलर मोठया प्रमाणात आढळले त्याची सुध्दा दुरूस्ती करून उपयोगात आणण्यासारखे असल्यास त्यांनासूध्दा उपयोगात आणून खर्चाची बचत करावी, व जे साहित्य निकामी असेल त्यांचे मुल्यांकन करून भंगार विकण्याबाबत निविदा काढा व जे साहित्य कोणत्याच कामाचे नाही त्याची यादी तयार करा व भंगार मार्गी लावा असे निर्देष दिले.

यावेळी मा.महापौर श्री.प्रवीण दटके, मा.निगम आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, उपायुक्त श्री.रविंद्र देवतळे यांनी मुख्यालयात सर्व विभाग प्रमुखांच्या कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छतेचा आढावा घेतला यावेळी मा.महापौर, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी मुख्यालय परिसरात स्वच्छता करून व कचरा गोळा करून अधिकारी व कर्मचा-यां समवेत स्वच्छ भारत अभियान उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला. यावेळी आयुक्त म्हणाले जसे आपण आपले घर नेहमी स्वच्छ ठेवतो त्याच भावनेतून प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालय स्वच्छ व निटनेटके व सुंदर ठेवण्याकरीता कर्तव्य भावनेतून कार्य करावे असे आवाहन मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी केले व कार्यालयाच्या भिंतीवर थूंकू नये व भिंती खराब करू नये अशा सूचना फलक लावा.

यावेळी उप आयुक्त श्री.रविन्द्र देवतळे, सहा.आयुक्त श्री.प्रकाश वराडे, आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार, नगरयंत्री श्री.मनोज तालेवार, कार्य.अभियंता राजेश भुतकर, कार्य.अभियंता महेश गुप्ता, श्री.अनिरूध्द चैगंजकर, परिवहन व्यवस्थापक श्री.शिवाजी जगताप, स्थावर अधिकारी श्री.आर.एस.भुते, कार्यकारी अभियंता श्री.डी.डी.जांभुळकर, निगम अधिक्षक श्री.फागो उके, पशुचिकीत्सा अधिकारी डॉ.गजेन्द्र महल्ले, सहा.अभियंता (विद्युत) श्री.मानकर, सहा.अग्निशमन अधिकारी श्री.सुनिल राऊत, केशव कोठे, राजु भांडारकर, जितेंद्र तोमर व सर्व विभागाचे विभाग प्रमुख व सर्व विभागाचे बहूसंख्य अधिकारी अभियंता व कर्मचारी उपस्थित राहून या स्वच्छता अभियानात सक्रीय सहभाग घेतला.









# 2 ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिना निमीत्त म.न.पा. तर्फे महापौर, उपमहापौर, मा. आमदार व म.न.पा. आयुक्त यांच्या उपस्थितीत शहरात विविध ठिकाणी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उपक्रम

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत 2 ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी नागपुर महानगरपालीके तर्फे संपुर्ण शहरात व 10 झोन स्तरावर स्वच्छता अभियान मोठया प्रमाणात राबविण्यात आले. प्रारंभी मा. महापौर श्री. प्रविण दटके, उपमहापौर श्री. सतीश होले, व म.न.पा. आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे यांनी सकाळी 07:00 वाजता व्हेरायटी चौक स्थित राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून विन्रम अभिवादन केले. तसेच 07:30 वाजता गोकूळपेठ चौक स्थानी माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. म.न.पा. च्या स्वच्छ भारत अभियानाची शुभारंभ केले. यावेळी आरोग्य समितीचे सभापती श्री.देवेंद्र मेहर, उपायुक्त श्री. रविंद्र देवतळे, सहा. आयुक्त श्री. प्रकाश वऱ्हाडे, स्थावर अधिकारी श्री. आर.एस. भूते, कार्यकारी अभियंता श्री. डी.डी. जांभूळकर आदि उपस्थित होते.

प्रारंभी मा. महापौर यांनी धरमपेठ झोन अंतर्गत रामनगर चौक ते अंबाझरी मार्ग स्थित हिलटॉप मार्गावर मुख्य रस्त्यावरील उंचावरील झाडे, गवत, कचरा, प्लास्टिक व इतर केर-कचरा मोठया प्रमाणात काढून गोळा करण्यात आला. या अभियानात मा. महापौर श्री. प्रविण दटके, म.न.पा. आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, आमदार श्री. प्रकाश गजभिये, आरोग्य समीतीचे सभापती श्री. देवेद्र मेहर, धरमपेठ झोन सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, अप्पर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, उपायुक्त श्री. रवींद्र देवतळे, सहा. आयुक्त श्री. महेश मोरोणे, प्रकाश वराडे, कार्यकारी अभियंता श्री. संजय गायकवाड, आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, माजी नगरसवेक श्री. बाबा मैंद, नगरयंत्री श्री. मनोज तालेवार, पशुचिकित्स अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, ग्रीन व्हीजल फाउंडेशन श्री. कौस्तुव चॅटर्जी, दक्षा बोरकर, सूरभी जैस्वाल, यांचेसह म.न.पा. शाळेचे शिक्षक व विद्यार्थी अंबाझरी तलावा संवर्धन समितीचे श्री. राम मुंजे यांचेसह विविध सामाजिक संस्था तसेच म.न.पा. पदाधिकारी/अधिकारी समवेत स्वच्छ अभियानास सहभाग घेतला व स्वच्छता उपक्रम राबविले. यावेळा मा. महापौर श्री. प्रवीण दटके व आ. प्रकाश गजभिये, आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, डॉ. रामनाथ सोनवणे या परिसरातील नागरिकांच्या घरो-घरी जावून स्वच्छता अभियानाचे महत्व पटवून देऊन या उपक्रमाला सहभागी होण्याचे जनतेला आव्हान करीत होते हे विशेष.

## रेल्वे स्टेशन परिसरात महापौर, आयुक्त व विभागीय रेल्वे प्रबंधक यांचे उपस्थितीत स्वच्छता अभियान संपूर्ण रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

बर्डी स्थित मुख्य रेल्वे स्टेशनच्या होम प्लॅटफार्म व सर्व प्लॅटफार्मवर नागपूर महानगरपालिका रेल्वे प्रशासन व संत निरंकारी चॅरीटेब फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान मोठया प्रमाणात राबविण्यता आला.

यावेळी मा. महापौर श्री. प्रवीण दटके, आरोग्य समितीचे सभापती श्री. देवेंद्र मेहर, म.न.पा. आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, अश्याप्रकारे संपूर्ण नागपूर शहरात सर्व झोन आशीनगर, मंगळवारी, सतरंजीपुरा, लकडगंज, नेहरूनगर, धंतोली, लक्ष्मीनगर, गांधीबाग, हनुमानगर तसेच विविध ठिकाणी झोन सभापती मा. नगरसेवक, म.न.पा.पदाधिकारी, अधिकारी, आमदार, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, शासकीय कार्यालये यांनी श्रमदान करून जनसहभागातून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्यात आले. या अभियान शहरातील नागरिक स्वयंसेवी संस्था, म.न.पा. पदाधिकारी, मा. नगरसेविका, अधिकारी/कर्मचारी, कार्यालये यांनी स्वयंत्फुर्तीपणे सहभागी झाल्याबद्दल मा. प्रवीण दटके व म.न.पा. आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांनी धन्यावाद व्यक्त केले.

विभागीय रेल्वे प्रबंधक श्री. ब्रिजेशकुमार गुप्ता, म.न.पा. अपर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, ए.डी.आर.एम. श्री. त्रीलेक कोठारी, सिनिअर डी.सी.एम. श्री. के.के. मिश्रा, जनसंपर्क अधिकारी श्री. प्रवीण पाटील व संत निरंकारी चॅरीटेब ट्रस्टचे क्षेत्रीय संचालक आर.एम. शर्मा, श्री. अविनाश नेमानी, घनशामदास केसवानी, रमेश करमचंदानी आदींनी रिजव्हॅशन काऊंटर, पार्सल परिसर, 18 नं. प्लॅटफार्म, पार्किंग परिसर व संपूर्ण प्लॅटफार्म आदी भागात स्वतः फिरूण स्वच्छता अभियान राबविण्यात आला यावेळी प्लास्टीक पन्नी, प्लास्टीक बॉटल, खर्रा पन्नी, केर कचरा गोळा करण्यात आला. यावेळी रेल्वे स्थानकावर उपस्थित नागरिक व प्रवासांनी दाद दिली.

## आय.क्लीन नागपूर स्वयंसेवी संस्थेतर्फे रेल्वेस्टेशन च्या सूरक्षा भिंतीवर आदीवासी चित्र

मुख्य रेल्वे स्टेशन समोरील सुरक्षा भिंतीवर मोठया प्रमाणात पाण खर्रा थुंकी व अस्वच्छ भिंती दिसतात. या सर्व भिंती स्वयंसेवी संस्था ‘आय.क्लीन’ नागपूर तर्फे सर्व सूरक्षा भिंतीला आकर्षक पेंट व रंगरंगोटी करून त्या सुरक्षा भिंती स्वच्छ करून आदीवासी आर्ट ”वारली पेटींग“ चित्र रेखाटून भिंती आकर्षक करण्यात आले. जेणेकरून कोणीही या भिंतीवर थूकणार नाही किंवा पेशाब करणार नाही व त्या भिंती सूरक्षीत राहतील या अभिनव कल्पनेतून स्वच्छता अभियान रेल्वे स्टेशन परिसरात राबविण्यात आले. या अभिनव कलाकृतीचे मा.महापौर श्री.प्रवीण दटके, म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर व विभागीय रेल्वे प्रबंधक श्री.ब्रिजेशकुमार गुप्ता, म.न.पा.अपर आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, आरोग्य समिती सभापती श्री.देवेन्द्र मेहर यांनी या ठिकाणी भेट देवून आय क्लीन नागपूर स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी श्रीमती वंदना मुजुमदार, संदिप अग्रवाल, अजिंक्य ठोकरे, जयदिप मोधी, शुभम सोनी, शुभम शेंडे, अनंत दिवे आदी कलाकारांचे त्यांचे या स्तृत्य उपक्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले अश्याप्रकारे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## नेताजी मार्केट सिताबर्डी परिसरात पश्चीम नागपूरचे आमदार सुधाकर देशमुख व संदीप जाधव यांचे नेतृत्वात स्वच्छता जनजागरण रैली

पश्चिम नागपूरचे आमदार श्री.सुधाकर देशमुख यांचे नेतृत्वात पश्चिम नागपूरातील सिताबर्डी, नेताजी मार्केट,

मोदी नं. 2, रेल्वेपुल सिताबर्डी टेकडी, सदर, व्हेरायटी चौक आदी परिसरात स्वच्छता अभियान जनजागरण रैली काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी स्वच्छतेचे महत्व विषद करून सांगण्यात येत होते.

या रॅलीत मा.महापौर श्री.प्रवीण दटके, मा.निगम आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी सहभागी होऊन उपस्थितांचा उत्साह वाढविला. या रॅलीत प्रामुख्याने माजी उपमहापौर व ज्येष्ठ नगरसेवक श्री.संदीप जाधव, धरमपेठ झोन सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, नगरसेविका श्रीमती संगीता गि-हे, नगरसेविका मिना तिडके, नगरसेविका लता यादव, दिपक गि-हे, अमर पारधी, गुड्डूभाई, सतिश वडे, अरूण मेटी आदी प्रामुख्याने सहभागी झाले होते.

**खामला भाजी बाजार ते भेंडे ले-आऊट रिंगरोड परिसरात स्वच्छता अभियान**

लक्ष्मीनगर झोन क्रं.1 अंतर्गत खामला भाजी बाजार ते भेंडे ले-आऊट ते आऊटर रिंग रोड ते वर्धा रोड पावेतो या मुख्य रस्त्यावरील बाजार परिसरातील स्वच्छता अभियान मोठया प्रमाणातत राबविण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसरातील झाडे झूडपे, गवत,केर कचरा उचलून स्वच्छ करण्यात आले.

यावेळी मा.महापौर श्री.प्रवीण दटके, आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, आरोग्य समिती सभापती श्री.देवेन्द्र मेहर, अपर आयुक्त डॉ.रामनाथ सोनवणे, सभापती श्री.गोपाल बोहरे, उपायुक्त श्री.रविन्द्र देवतळे, डॉ.प्रदीप दासरवार, सहा.आयुक्त श्री.गणेश राठोड, कार्यकारी अभियंता श्री.महेश गुप्ता, विलास फडणवीस, लोककर्म नगरयंत्री, विकास अभियंता, विभागातील बहुसंख्य कर्मचारी व परिसरातील शाळेचे सर्व शिक्षक व विभागातील कर्मचारी अधिकारी व विविध स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित राहून स्वच्छता अभियान मोठया प्रमाणात राबविण्यात आले.

हनुमान नगर झोन क्रं. 3 अंतर्गत जूनी शुक्रवारी स्थित राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे प्रतिमेला मा.उपमहापौर श्री.सतिश होले यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी झोनच्या सभापती श्रीमती स्वाती आखतकर, माजी सभापती श्रीमती सारीका नांदुरकर, नगरसेवक डॉ.छोटू भोयर, झोनचे सहा.आयुक्त श्री.राजेश भिवगडे, कार्यकारी अभियंता श्री.कांतीकुमार सोनकुसरे, नागरी सुविधा केन्द्राचे प्रभारी अभियंता श्री. आर.एम. कांबळे आदी आवर्जुन उपस्थित होते.

यानंतर म.न.पा.च्या हनुमान नगर झोन अंतर्गत स्वच्छता अभियानाला प्रारंभ झाला. क्रीडा चौक हनुमाननगर, मानेवाडा चौक, तुकडोजी पुतळा परिसर, छोटा ताजबाग परिसर, जूनी शुक्रवारी परिसर आदी भागात मोठया प्रमाणात झाडे, झुडपे, प्लास्टीक पिशव्या व केर कचरा, ओला कचरा व सुखा कचरा वेगवेगळा बोरीमध्ये भरण्यात येत होता. उचलून स्वच्छता अभियान राबविण्यात आला. यावेळी म.न.पा.शाळेचे शिक्षक व विद्यार्थी यांनी सफाई अभियान रॅली काढून परिसरात जनजागृती केली.

गांधीबाग झोन क्रं.6 अंतर्गत स्वच्छता अभियानात मोठया प्रमाणात राबविण्यात आले. प्रारंभी झोनच्या सभापती श्रीमती विद्या कन्हेरे व ज्येष्ठ नगरसेवक श्री.प्रफुल्ल गुडदे पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीमती रश्मी फडणवीस यांनी गांधीबाग चितार ओळ स्थित राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून

यावेळी सहा.आयुक्त श्री.अशोक पाटील, माजी नगरसेविका श्रीमती सिंधुताई देहलीकर, हत्तीरोग अधिकारी श्रीमती जयश्री थोटे, बाजार अधिक्षक श्री.दिनकर उमरेडकर व बहुसंख्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. नंतर संपूर्ण गांधीबाग व महाल परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अशा प्रकारे स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत म.न.पा.च्या सर्वच दहाही झोनमध्ये स्वच्छता अभियाना अंतर्गत संपूर्ण परिसरात प्रभातफेरी काढून स्वच्छतेबाबत जनजागृती करून स्वच्छ भारत, स्वस्थ भारत असे नारे देण्यात येत होते.














# डेन्मार्क एम्बेसीचे टॉम सॅबेस्टीन याची म.न.पा.ला सदिच्छ भेट

महापौर व आयुक्त व्दारा स्वागत म.न.पा.च्या विविध विकास कामाची घेतली माहिती. भारतातील डेन्मार्क दुतावासातील इनोव्हेशन सेंटर चे टेप्युटी हेड श्री.टॉम सेबेस्टीन यांनी आज दिनांक 3 ऑक्टोंबर रोजी महापौर श्री.प्रवीण दटके यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी महापौर श्री.प्रवीण दटके यांनी श्री.टॉम सेबेस्टीन यांचे तूळशी रोपटे व त्रीशताब्दी ग्रंथ देऊन त्याचे हार्दिक स्वागत केले.

यावेळी सत्तापक्ष नेते श्री.दयाशंकर तिवारी, अपर आयुक्त डॉ.आर.झेड.सिद्दीकी, परिवहन समितीचे सभापती श्री.नरेन्द्र (बाल्या) बोरकर, महिला बालकल्याण समितीच्या सभापती श्रीमती रश्मी फडणवीस, धरमपेठ झोन सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, नगरसेवक श्री.राजेश घोडपागे, नगरसेविका श्रीमती सुमित्रा जाधव, नगरसेविका श्रीमती जयश्री वाडीभस्मे, माजी नगरसेवक श्री.संदीप गवई आदी उपस्थित होते.

यावेळी श्री.टॉम सॅबेस्टीन यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, नागपूर शहराची स्मार्ट सिटी म्हणून निवड झाली आहे, आपण स्मार्ट सिटी अंतर्गत कोणत्या सूख सुविधा पूरविणार याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी मी या शहरात आलो आहे. स्मार्ट सिटी म्हणून निवड झालेल्या जयपूर, काकीनाडा आदी शहरालासुध्दा भेट दिली......

नागपूर शहर स्मार्ट सिटी अंतर्गत कोणत्या जनतेला सुख सुविधा पूरविणार याबाबत मी उत्सुक आहे, डेन्मार्क हा देश लहान आहे पण विकसीत देश आहे. येथील मुख्य उद्योग हा दुग्ध व्यवसाय आहे, नवतत्राज्ञानाच्या माध्यमातून या देशाचे चांगली प्रगती केली आहे. उद्योगात या देशाचे नांव लौकीक केले आहे, नागपूर शहर हे संत्र्याकरीता प्रसिध्द शहर असून नागपूर शहर स्मार्ट सिटी अंतर्गत कोणत्या सूख सूविधा पूरविणार आहे.

यावेळी माहिती देतांना मा.महापौर श्री.प्रवीण दटके यांनी सांगितले की, नागपूर शहर देशाच्या हृदयस्थानी वसलेली आहे. या शहरातून देशाच्या चारही बाजूला दळणवळण वाहतूक व्यवस्था आहे, नागपूर शहरात 24X7 ही पाणी पूरवठा योजनेमुळे मुबलक पाणी पुरवठा मिळाला आहे, तसेच 330 MLD चा STP प्लांट सूरू करण्यात येत आहे. तसेच लहान लहान STP प्लांट तयार करण्यात येत आहे, लंडनस्ट्रीट योजना, नागनदीचा विकास आराखडा, मेट्रो रेल्वे तसेच केंद्र व राज्य सरकारचे सर्व प्रमुख योजना व संस्था नागपूर शहरात येत आहे. सिमेंट रस्ते, पार्कींग व्यवस्था, ग्रीन बस बाबत माहिती देवून नागपूर शहर हे लाजेस्टीक हब बनण्याचा मार्गावर आहे. नंदग्राम योजना राबविण्याचा विचार सुरू असून स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील जनतेला चांगल्या सुख सूविधा उपलब्ध करून देण्याचा मानस मा.महापौर यांनी यावेळी व्यक्त केला. संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले.

टॉम सॅबेस्टीन यांना आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी सादरीकरणाव्दारे दिली माहिती. डेन्मार्क चे दुतावासातील डेप्युटी हेड श्री.टॉम सॅबेस्टीन यांनी म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांची त्यांचे कक्षात भेट घेतली. यावेळी मा.निगम आयुक्त यांनी श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात म.न.पा.च्या विविध योजना व उपक्रमाची पावर प्रेजेंटेशन व्दारे सादरीकरणाव्दारे माहिती दिली.

यावेळी मा.निगम आयुक्त यांनी ॲडव्हांटेज नागपूर लाजेस्टीक हब, मेट्रो, मिहान प्रकल्प यामुळे शहराचा

झपाटयाने विकास होणार आहे, शहराचे एतिहासीक महत्व, तलावाचा विकास, स्मार्ट पर्यावरण, स्मार्ट गव्हन्स, स्मार्ट लिव्हींग, पॅनसीटी, नाग रिव्हर, डेव्हल्पमेंट, STP वाटर मॅनेजमेंट, फ्लड मॅनेजमेंट, 24X7 पाणी पुरवठा, वाहतूक सुधारणा, स्लम वस्त्याचा विकास, लँड मॅनेजमेंट, ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट व इतर पायाभूत सूविधा कसे पूरविणार याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. यावेळी श्री.टॉम सॅबेस्ट्रीन यांनी नागपूर शहर हे देशाच्या मध्यभागी वसलेले शहर आहे व या शहराला ऐतिहासीक महत्व असल्याचे सांगीतले, स्मार्ट सिटी करीता नागपूर शहर उपयुक्त शहर असून या शहराच्या झपाटयाने विकास व मोठे प्रकल्प शहरात येत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून सुभेच्छा दिल्या.

यावेळी अपर आयुक्त डॉ.आर.झेड.सिद्दीकी, उपायुक्त श्री.रविन्द्र देवतळे, मुख्य अभियंता श्री.उल्हास देबडवार, कार्यकारी अभियंता सर्वश्री दिलीप जामगडे, संजय गायकवाड, नरेश बोरकर, महेश गुप्ता, अनिरूध्द चैगंजकर, परिवहन अधिकारी श्री.शिवाजी जगताप आदी उपस्थित होते.



# नागपूर होणार जागतिक दर्जाचे शहर. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नागपूर होणार जागतिक दर्जाचे शहर–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जयताळा सिमेंट क्रॉंक्रिट रस्त्याचे भूमिपूजन

**नागपूर, ता. २३:** आजवर जनतेने रस्त्यांच्या बाबतीत अनेक हाल-अपेष्ठा सहन केल्या, वर्षानू वर्ष हे मार्ग सतत खराब होत होते, मात्र या पुढे पन्नास वर्ष टिकेल असे सिमेंट क्रॉंक्रिटचे रस्ते आम्ही जनतेला देणार आहोत असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते रविवार (ता. २३ ) रोजी जयताळा रोड, सुभाष नगर टि-पॉईंट, शितला माता मंदिर येथे सिमेंट क्रॉंक्रिट रस्त्यांचे व मलजल वाहिनीच्या कामाच्या भूमिपूजनाच्या वेळी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रिय भूपृष्ठ परिवहन, महामार्ग व जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, महापौर प्रवीण दटके, खासदार पद्मश्री डॉ विकास महात्मे, आमदार प्रा. अनिल सोले, आ. सुधाकर कोहळे, आ. डॉ. मिलिंद माने, सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, जलप्रदाय समिती सभापती संदीप जोशी, माजी स्थायी समिती अध्यक्ष रमेश सिंगारे, अविनाश ठाकरे, लक्ष्मी नगर झोन सभापती निलीमा बावणे, धंतोली झोन सभापती सुमित्रा जाधव, माजी नगरसेवक राजू हडप, नंदा जिचकार, दक्षिण पश्चिम नागपूर भाजपा मंडळ अध्यक्ष प्रकाश भोयर, मुख्य अभियंता उल्हास देबडवार, अधिक्षक अभियंता मनोज तालेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणालेत की सात लाख झोपडपट्टी धारकांना पट्टे वाटपाचा निर्णय शासनाने घेतला आहे. केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात शहराचा सर्वांगिण विकास होत आहे. मेट्रो रेल्वेमुळे सार्वजनिक वाहतूकीत सुधारणा होईल, मनपा व नासुप्र मिळून प्रत्येकी तीन-तीनशे कोटी प्रमाणे संपूर्ण शहरात क्रॉंक्रिट रस्त्याचे जाळे निर्माण होईल. देशातील उत्तम शहर म्हणून नागपूर शहराची ओळख लवकरच निर्माण होईल. नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे मोठ्या प्रमाणात शासनाचे प्रयत्न सुरु आहे ,त्यामुळे येत्या २०१९ पर्यंत देशातीलच नव्हे तर जागतिकस्तरावरील एक प्रमुख शहर म्हणून नागपूरची ओळख निर्माण होईल असा विश्वास मुख्यमंत्री यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून बोलताना केंद्रिय मंत्री नितीन गडीकरी म्हणाले की शहरातील जमिन काळ्या मातीची (ब्लॅक कॉटन सॉईल) असल्यामुळे येथील डांबरी रस्ते दोन वर्षाच्या वर टिकत नाही, मी पालकमंत्री असताना पंधरा-वीस वर्षापूर्वी बांधलेले सिमेंट-कॉंक्रिटचे रस्ते अद्यापही चांगल्यास्थितीत आहे. त्यामुळे शहरातील रिंगरोड व अतंर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे काम हाती घेण्यात येत आहे. अनधिकृत वस्त्यांमध्ये मनपाला विकास कामे करता येत नसल्यामुळे खासदार निधीतून कामे केली असून जवळपास २८ हजार कोटींची कामे अडीच वर्षात सुरु झाली आहे. या भागाचे आमदार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागरिकांच्या समस्यांची चांगली जाण असून त्यांच्याच पुढाकाराने झोपडपट्टीवासियांना जमिनीचे पट्टेवाटप सुरु झाले आहे. मेट्रो रेल्वेसाठी ९ हजार कोटी देण्यात आले असून, जानेवरी २०१८ पर्यंत शहरातील नागरिकांना मेट्रोची सुविधा उपलब्ध होणार आहे. स्थानिक तरुणांना रोजगारासाठी मुंबई-पुणे येथे जावे लागत होते त्यामुळे मिहान प्रकल्पा अंतर्गत ९ हजार ८७० तरुणांना १९ कंपन्यांच्या माध्यमातून रोजगार प्राप्त झाला आहे. येत्या तीन महीन्यात २२ कपन्याच्या माध्यमातून ५ हजार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येणार आहे तसेच येत्या पाच वर्षात ५० हजार तरुणांना रोजगार मिळवून देण्यात येईल असा विश्वास व्यक्त केला. याशिवाय मेट्रोसाठी कार्य करणाऱ्या चायनीज रोलिंग स्टॉक कंपनीच्या माध्यातून देखिल लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. भारतीय खेळ प्राधिकरणतर्फे (साई) १४३ एकर जागा मनपाने क्रीडा संकुलासाठी उपलब्ध करुन दिली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू येथून तयार होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केल्या. शंभर एकर जागेवर जागतिक स्तराचे विद्यापीठ सुरु करणार असून विदर्भाच्या शेतकऱ्यांच्या मुलांना १५ टक्के फि सवलत या विद्यापीठातून मिळेल. अंबाझरीच्या विवेकानंद स्मारकाच्या धर्तीवरच तेलंखेडी येथे लेझर शोची सुरवात करण्यात येणार आहे. अडीच हजार प्रेक्षक संख्या असणारे सुरेश भट सभागृह लवकरच रसिकांसाठी सुरु होणार असून चावीस बाय सात पाणीपूरवठा योजना याबाबत देखिल त्यांनी माहिती देऊन सर्व विकासकार्याचे श्रेय त्यांनी जनतेला दिले.

यावेळी बोलताना पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे म्हणाले की पूर्वी निधीसाठी शहराला वणवण फिरावे लागत होते आता मात्र शहराच्या विकासाठी गडकरी यानी ३० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. पुढील काळात संपूर्ण शहर एलईडी युक्त होईल आणि संमूर्ण शहर भूमिगत विद्यूत वाहीनीनी जोडले जाईल. पुढील तीन वर्षांत केलेल्या कामाचे प्रतिबिंब जनतेला दिसेल. याप्रसंगी बोलताना महापौर प्रविण दटके म्हणाले की, १७ ते १८ कोटीचे व १३ कोटीचे असे दोन पॅकेजचे भूमिपूजन आज संपंन्न झाले असून प्रथम रिंगरोडचे आतील व नंतर बाहेरचे रस्ते असे एकून २२ कोटीचे काम सुरु झाले आहेत. शासनाने ट्रंक लाईनसाठी एकूण २५ कोटी रुपये दिले. नागपूरात खूप सारे विकास कार्य सुरु असल्यामुळे जनतेला वाहतूकीचा त्रास होतो आहे मात्र पुढील सुविधांसाठी थोडासा त्रास सहन करण्याचे आवाहन त्यांनी जनतेला केले. टाकळी बुद्धविहारसाठी गडकरी यांच्या खासदार निधीतून ३३ लाखाचे कार्यादेश देण्यात आल्याची माहिती महापौरांनी यावेळी दिली. २०१९ पर्यंत देशातले सर्वोत्तम शहर म्हणून नागपूर शहराची ओळख राहील. नगरसेवक पदाधिकाऱ्यासह नागरिक व पक्ष कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी सरदार पटेल क्रीडा मंडळातर्फे ५१ हजाराचा निधी जलयुक्त शिवार योजनेसाठी मुख्यमंत्री यांच्या स्वाधीन करण्यात आला. सुत्र संचालन सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी यानी केले.

**(चौकट)**

नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र. ६९ खामला येथे मलजल वाहि नी( ट्रंक लाईन) कामाचे भूमिपूजन झाले यात सिमेंट कॉंक्रिट रोड फेज-२ अंतर्गत दक्षिण अंबाझरी रोड, रहाटे कॉलनी टी-पॉईंट वर्धा रोड ते माटे चौक, दक्षिण अंबाझरी रोड, माटे चौक ते अंबाझरी टी-पॉईट, शितला माता मंदिर ते मंगलमूर्ती चौक, आर.पी.टी.एस. रोड माधवनगर ते वेस्ट हायकोर्ट रोड पर्यंत रस्त्यांचे कामाचे भूमिपूजन संपंन्न झाला.



# येणारा काळ महिला उद्योजिकांचा : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## नागपूर महानगरपालिका, नागपूर

(जनसंपर्क विभाग)

**वृत्तविशेष** **दिनांकः २३ ऑक्टोबर २०१६**

## येणारा काळ महिला उद्योजिकांचा : केंद्रिय मंत्री नितीन गडकरी

### पाच दिवसीय महिला उद्योजिका मेळाव्याचा समारोप

**नागपूर, ता. २३** : येणारा काळ हा महिला उद्योजिकांचा आहे, त्यांनी आणखी चांगले काम करावे, गुणवत्ता वाढवावी, आजचा काळ हा गुणवत्तेचा आहे, प्रगतीचे दोन मंत्र आहेत एक गुणवत्ता आणि दुसरे पॅकेजिंग, मालाची गुणवत्ता व उत्पादकतेसोबतच आकर्षक पॅकेजिंग यामुळे महिलांना त्यांचे उत्पादन बाजारपेठेत मांडण्याची आणखी संधी मिळेल असे उद्‌बोधन केंद्रिय भूपृष्ठ परिवहन महामार्ग व जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ते नागपूर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे आयोजित पाच दिवसीय महिला उद्योजिका मेळाव्याच्या समारोपाप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महापौर प्रवीण दटके, आ. कृष्णा खोपडे, आ. विकास कुंभारे, बसपा पक्षनेता गौतम पाटील, अप्पर आयुक्त रामनाथ सोनवणे, महानगरपालिका महिला व बालकल्याण सभापती रश्मी फडणवीस, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, सहा. आयुक्त महेश मोरोणे, सभापती सुमित्रा जाधव, मनीषा कोठे, जयश्री वाडीभस्मे, साधना बरडे, निलिमा बावणे, पल्लवी शामकुळे, विद्या कन्हेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना गडकरी म्हणाले, की बचत गटाच्या महिलांसाठी अजून खूप काही काम करायचे बाकी आहे. त्यांनी प्रत्येक घरातून प्लास्टिक गोळा केल्यास त्याचा उपयोग डांबरी रस्ते बांधणीसाठी होईल, यासाठी बाजारभावापेक्षा महिलांना जास्त भाव देण्यात येईल. रोजगार आणि पर्यावरण दोघांनाही हे पूरक ठरेल. महिलांनी संशोधनातून नविन गोष्टी शिकाव्या. साखरेचा उपयोग करुन तयार करण्यात येणारे ऑर्गेनिक साबण हे केमिकल साबणापेक्षा जास्त आरोग्यादी असताना त्याला भाव मिळत नाही, आम्ही ते कंपनी न विकता महिला बचत गटांना देणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ' पूर्ती ' चा विशेष उल्लेख करुन पूर्तीमध्ये सर्वच कष्टकरी महिला या संघर्षातून वर आल्या असल्याचे सांगितले..यावेळी पाच दिवस पाच वर्ष मनपाने यशस्वी महिला मेळाव्या आयोजित केला याबाबत त्यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी समुह गीत सादर केले. याप्रसंगी उत्कृष्ट स्टॉल धारकाचे बक्षिस अनुक्रमे नेहा वैद्य, हर्षा बोरीकर, सोनाली क्रिएशनच्या स्टॉलने पटकावले. उत्तेजनार्थ बक्षिस उषा भोयर, शर्मिला सराफ, चंद्रकला चिकाणे यांनी पटकावले. सुत्र संचालन प्रतिभा लोखंडे यांनी केले. आभार धरमपेठ झोन क्रमांक २ च्या सभापती वर्षा ठाकरे यांनी मानले.

(चौकट)

**महिलांचा फॅशन शो**

याप्रसंगी बोलताना गडकरी यांनी सर्व वयोगटातील महिलांचा फॅशन शो आयोजित करण्याचा सल्ला दिला. स्टॉलधारक उद्योजिका यांना रॅम्पवर चालवून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागेल असे त्यांनी सांगितले. जिवन स्वाभिमानाने जगण्याची संधी त्यांना मिळेल. मेळाव्यात सातत्याने नवीन विचार राबवून आणखी भव्य प्रमाणात महिलांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देशाच्या विकासात भर घालण्याचे आवाहन त्यांनी केले.


नागपूर महानगरपालिका, नागपूर
महिला उद्योजिका मेळावा
मा.ना.श्री.नितीन गडकरी
केन्द्रीय मंत्री, भारत सरकार


महिला उद्योजिका मेळावा
मा.ना.श्री.नितीन गडकरी


महिला उद्योजिका मेळावा
मा.ना.श्री.नितीन गडकरी